**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** मिरज ग्रामीण
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0596 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/11/2025 23:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 17/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/11/2025
**Time From (वेळेपासून):** 13:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/11/2025 **Time (वेळ):** 22:43 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 055
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/11/2025 22:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय मालगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यास्मीन शरीफ इनामदार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो सांगली ,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो सांगली ,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मामासो तिप्पान्ना कांबळे | | | 1. गणेश मंदीरा जवळ,मालगाव, मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
दि. 17.11.2025जबाब

मी श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार, वय -38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9527904700
सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 10/11/2025 रोजी 11.59 वा चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.तानाजी आप्पासो रुईकर, रा.मिरज यांनी आम्हास संपर्क करून त्यांची तलाठी कार्यालय, मालगाव येथील खाजगी इसम कांबळे यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार कळविली. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.तानाजी रुईकर यांना 13.00 वा तानंग फाटा मालगाव रोड मिरज येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत सांगली शहर यांना पत्रव्यवहार करुन वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करुन त्यांना इकडील कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

आम्ही देले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच साक्षीदार हे 12.50 वाजता इकडील कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. मी वरील दोन्ही पंचांना एक खाजगी इसमाविरुध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/2008 अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अँथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं.एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 13.00 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, कुपवाड एमआयडीसी मार्गे तानंग फाटा मालगाव रोड येथे सुरक्षित ठिकाणी 13.30 वा चे सुमारास दाखल झालो. काही वेळाने तक्रारदार हे त्यांचेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच-10-डीएल-7771 वरून आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांना आमचेकडील शासकीय वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. गणेश शामराव गदगडे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. अमितकुमार सुरेश चव्हाण यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. रुईकर यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे पत्नीचे शेतामधून जाणारे रस्ता मागणीचा निकाल तक्रारदार/जाबदार यांचे बाजुने लावणेसाठी तसेच तलाठी यांना सांगून अहवाल देणेसाठी तलाठी कार्यालय मालगाव येथील श्री.कांबळे मामा यांनी त्यांचेकडे 15,000 /- रूपये लाच मागत असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. रुईकर यांनी त्यांचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी उदगांव वेस, माळी गल्ली, मिरज ता. मिरज जि. सांगली या ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझे सासरे कै सुरेश नारायण माळी यांची मालगांव गांवचे हद्दीत गट नंबर

1175/2 मध्ये 1 हेक्टर 20 आर शेतजमीन आहे. माझे सासरे मयत झाले नंतर सदर जमीनीस माझी पत्नी 1) सौ शुभांगी रुईकर व इतर 2) रंजना सुरेश माळी, 3) प्रशांत सुरेश माळी, 4) गितांजली जालिंदर एरंडोले असे वारस लागले आहेत. माझा मेव्हुणा प्रशांत हा मुंबई येथे नोकरीस आहे.
मालगांव गांवचे हद्दीत गट नंबर 1175/2 चे दक्षिण बाजुस असले गट नंबर - 1200, 1201, 1202, 1203 चे शेतजमीन मालकांनी आमचे जमीनीचे गट नंबर – 1175/2 चे सरबांधावरुन रस्ता मिळणे करीता मा. तहसिलदार मिरज यांचे कोर्टात अर्ज केला आहे. सदर रस्ता केसची सुनावणी तहसिलदार मिरज यांचे न्यायालयात सुरु आहे. दि.29.07.2025 रोजी रस्ता केसचे सुनावणीकामी जाबदार यांना तहसिल कार्यालय मिरज येथे हजर राहणे बाबत मालगांव येथे माझे मेहुण्याचे घरी नोटीस प्राप्त झाली होती. सदर नोटीस माझा मेहुणा प्रशांत यांने मला व्हाट्सअपला पाठवली होती.

दि.16.10.2025 रोजी तहसिलदार मिरज या स्थळ पाहणीकरीता ऊशीरा मालगांव येथे आल्या, अंधार पडला असल्यामुळे त्यांना स्थळ पाहणी पुर्ण करता येत नसल्याने त्यांनी नंतर जाबदार यांना नोटीस देवुन स्थळ पाहणी पंचनामा पुर्ण करता येईल असे सांगुन निघुन गेल्या.

त्यानंतर दि.10.11.2025 रोजी मालगांव येथील श्री कांबळे मामा यांनी माझा मेहुणा श्री प्रशांत सुरेश माळी याला सकाळी 09.30 वा. चे सुमारास फोनद्वारे संपर्क करुन रस्त्याचे प्रकरण तलाठी मालगांव यांचेकडे आहे. सदर प्रकरणी रिपोर्ट पाठवुन ते निकाली काढण्याचे आहे. त्याकरीता 15,000/- रुपये खर्च येणार आहे. तुम्ही तात्काळ मालगांव येथे या, रस्ता प्रकरणामध्ये निकाल विरुद्ध लागला तर मला सांगु नका असे सांगीतलेने, माझा मेहुणा प्रशांत यांनी मला 10.00 वा.चे सुमारास संपर्क करुन सर्व घटना सांगीतली. मी मेहुणा प्रशांत याला तु येऊ नको मी सर्व पाहतो असे सांगीतले.

रस्त्याचे कामाकरीता शासकीय शुल्काची आवश्यकता नसल्याने मालगांव तलाठी कार्यालयात काम करणारे कांबळे मामा हे आमचे जमीनीमधुन रस्ता मागणी केले केसचा स्थळ पाहणी पंचनामा पुर्ण करुन आमचे बाजुने अहवाल पाठवण्याचे काम करुन देवून खटल्याचा निकाल जाबदार यांच्या बाजूने लागण्यास सहाय्य करण्यासाठी मागत असलेले 15,000/- रुपये लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे.

आज रोजी मी तलाठी कार्यालय मालगांव येथे काम करणारे कांबळे मामा यांची तलाठी कार्यालय मालगांव येथे जावुन भेट घेणार आहे. कांबळे मामा हे माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.

माझेत व श्री कांबळे मामा यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती. आता मी आपले समक्ष तहसिल कार्यालय मिरज यांचेकडून रस्ता केस सुनावणीकामी हजर राहणे बाबत पाठवलेल्या नोटीसीची झेरॉक्स प्रत हजर करत आहे." अशी हकीकत नमूद आहे.
त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन श्री.कांबळे, खाजगी इसम यांचेविरुध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच क्र.1 गणेश गदगडे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी 13.49 वा चे सुमारास माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.59 वा सुरु करुन तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचे गळयामध्ये [illegible] सहाय्याने अडकवून तक्रारदार व पंच नं.1 गणेश गदगडे यांना श्री.कांबळे यांची तलाठी कार्यालय मालगाव येथे भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. तानाजी रुईकर हे त्यांचेकडील हंुडाई व्हेन्यु कार क्र. एमएच 10 डीएल 7771 मधून पंच नं.1 गदगडे यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच नं.1 गदगडे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 14.09 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. गणेश गदगडे यांना, श्री.कांबळे, खाजगी इसम यांची भेट झाली का? तक्रारदार व

त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून मालगाव गावातील तलाठी कार्यालय येथे गेलो. आम्ही कार्यालयाचे समोर कार पार्क करून चालत कार्यालयाजवळ गेलो. त्यावेळी कार्यालयाजवळ शेळया विक्रीचा बाजार भरलेला होता. त्यावेळी तक्रारदार हे कार्यालयाचे बाहेर एका इसमाशी त्यांचे कामा बाबत चर्चा करू लागले. त्यावेळी सदर इसमाने तक्रारदार यांना "ते संपवून टाकू की विषय..... क्लोज केस करून मिटवून टाकू........ यांचा रिपोर्ट घेवून केस हे जमा करून टाकू, आता काय निकालीच काढाय लागणार ना केस" असे म्हणाले. तक्रारदार व सदर इसमांचे बोलण्यावरून ते कांबळे, खाजगी इसम असल्याचे माझी खात्री झाली.

त्यावेळी तक्रारदार यांनी कांबळे यांना "काय करायच मग ते" असे विचारले असता कांबळे यांनी "आता ते तुमच्या हिशोबान काय करायच ते करा - मी काय बोलत न्हाय.... तुमच्या हिशोबान काय करायच ते करा, माझ मी ते निकाली काढून घेतो, विषय संपला, परत तिथ काय ते उद्भवणार पण नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "सांगा की काय असेल ते?" असे विचारले असता कांबळे यांनी "नाही काय सांगत नाय मी...... तुमच तुम्ही संपवून टाका आणि मोकळ व्हा.... माझ मी क्लिअर करून घेतो..... बाकीचा रस्ता मंजुर करताच येत नाय ना रस्ता........ रिपोर्ट देवून टाकून, ती केस जमा करून मोकळ होतो" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "हा..हा" असे म्हणाले. त्यानंतर कांबळे यांनी तक्रारदार यांना "तहसिल ऑफीसला देखील बोलून आलुय, सांगून पण आलोय, निकाली काढा म्हणून" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आपल्याकडन रिपोर्ट पाठवाय लागतुय का?" असे विचारले असता कांबळे यांनी "हयांच्याकडन सर्कलला वगैरे, आण्णासायबाला सांगून" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना "कधी पाठविणार रिपोर्ट काय?" असे विचारले असता कांबळे यांनी "उद्याच्या उद्या पाठवून जमा करून टाकणार केस" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना "कस काय करता?" असे विचारले असता कांबळे यांनी "द्या तुमी, काय तुमच्या इच्छेन ही करा, काय आडचण नाय........ तुमच तुमी द्या, माझ मी काम करून घेतो. असे म्हणाले.

त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा कांबळे यांना रक्कम सांगणेची विनंती केली असता कांबळे यांनी त्यांचे हाताचे "दहा बोटे" तक्रारदार यांना दाखविली. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "दहा पर्यंत?" असे विचारले असता कांबळे यांनी "करा, करा जावा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी रक्कम कमी करणेची विनंती केली असता कांबळे यांनी त्यांना "पंधरा सांगितले हुते, तुमाला आता बोलू शकत नाय मी" अस.... करा जावा, संपवून टाकतो विषय..." असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना चार...साडेचार पर्यंत येवू दे का अशी विचारणा केली असता कांबळे यांनी तक्रारदार यांना "चार साडेचार पर्यत या" असे म्हणालेने तक्रारदार व मी असे तलाठी कार्यालय मालगाव येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 गणेश गटवडे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Ajit Pandurang Sid(I (Inspector)) / 1000359APSM8001K **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद): **No.(क्र.):**

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर
मिरज ग्रामीण पोलीस ठा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ajit Pandurang Sid
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1000359APSM8001K

**वर्दी जबाब दि. १७.११.२०२५**

मी श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार, वय -३८ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं. ९५२७९०४७००

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. १०/११/२०२५ रोजी ११.५९ वा चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.तानाजी आप्पासो रुईकर, रा.मिरज यांनी आम्हास संपर्क करून त्यांची तलाठी कार्यालय, मालगाव येथील खाजगी इसम कांबळे यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.तानाजी रुईकर यांना १३.०० वा तानंग फाटा मालगाव रोड मिरज येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत सांगली शहर यांना पत्रव्यवहार करून वर्ग-३ चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना इकडील कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

आम्ही दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच साक्षीदार हे १२.५० वाजता इकडील कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. मी वरील दोन्ही पंचांना एक खाजगी इसमाविरुध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/२००८ अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं.एमएच-१०-डीक्यु-९५३० मधून कार्यालयातून १३.०० वाजता रवाना होवून स्टेशन चौक, कुपवाड एमआयडीसी मार्गे तानंग फाटा मालगाव रोड येथे सुरक्षित ठिकाणी १३.३० वा चे सुमारास दाखल झालो. काही वेळाने तक्रारदार हे त्यांचेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच-१०-डीएल-७७७१ वरून आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांना आमचेकडील शासकीय वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. गणेश शामराव गदगडे यांनी पंच नं. १ म्हणुन व श्री. अमितकुमार सुरेश चव्हाण यांनी पंच नं.२ म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. रुईकर यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे पत्नीचे शेतामधून जाणारे रस्ता मागणीचा निकाल तक्रारदार/जाबदार यांचे बाजुने लावणेसाठी तसेच तलाठी यांना सांगून अहवाल देणेसाठी तलाठी कार्यालय मालगाव येथील श्री.कांबळे मामा यांनी त्यांचेकडे १५,०००/- रूपये लाच मागत असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. रुईकर यांनी त्यांचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी उदगांव वेस, माळी गल्ली, मिरज ता. मिरज जि. सांगली याठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझे सासरे कै सुरेश नारायण माळी यांची मालगांव गांवचे हद्दीत गट नंबर ११७५/२ मध्ये १ हेक्टर २० आर शेतजमीन आहे. माझे सासरे मयत झाले नंतर सदर जमीनीस माझी पत्नी १) सौ शुभांगी रुईकर व इतर २) रंजना सुरेश माळी, ३) प्रशांत सुरेश माळी, ४) गितांजली जालिंदर एरंडोले असे वारस लागले आहेत. माझा मेव्हुणा प्रशांत हा मुंबई येथे नोकरीस आहे.

मालगांव गांवचे हद्दीत गट नंबर ११७५/२ चे दक्षिण बाजुस असले गट नंबर - १२००, १२०१, १२०२, १२०३ चे शेतजमीन मालकांनी आमचे जमीनीचे गट नंबर – ११७५/२ चे सरबांधावरुन रस्ता मिळणे करीता मा. तहसिलदार मिरज यांचे कोर्टात अर्ज केला आहे. सदर रस्ता केसची सुनावणी तहसिलदार मिरज यांचे न्यायालयात सुरु आहे. दि.२९.०७.२०२५ रोजी रस्ता केसचे सुनावणीकामी जाबदार यांना तहसिल कार्यालय मिरज येथे हजर राहणे बाबत मालगांव येथे माझे मेहुण्याचे घरी नोटीस प्राप्त झाली होती. सदर नोटीस माझा मेहुणा प्रशांत यांने मला व्हाट्सअपला पाठवली होती.

दि.१६.१०.२०२५ रोजी तहसिलदार मिरज या स्थळ पाहणीकरीता ऊशीरा मालगांव येथे आल्या, अंधार पडला असल्यामुळे त्यांना स्थळ पाहणी पुर्ण करता येत नसल्याने त्यांनी नंतर जाबदार यांना नोटीस देवुन स्थळ पाहणी पंचनामा पुर्ण करता येईल असे सांगुन निघुन गेल्या.

त्यानंतर दि.१०.११.२०२५ रोजी मालगांव येथील श्री कांबळे मामा यांनी माझा मेहुणा श्री प्रशांत सुरेश माळी याला सकाळी ०९.३० वा. चे सुमारास फोनद्वारे संपर्क करुन रस्त्याचे प्रकरण तलाठी मालगांव यांचेकडे आहे. सदर प्रकरणी रिपोर्ट पाठवुन ते निकाली काढण्याचे आहे. त्याकरीता १५,०००/- रुपये खर्च येणार आहे. तुम्ही तात्काळ मालगांव येथे या, रस्ता प्रकरणामध्ये निकाल विरुद्ध लागला तर मला सांगु नका असे सांगीतलेने,

माझा मेहुणा प्रशांत यांने मला १०.०० वा.चे सुमारास संपर्क करुन सर्व घटना सांगीतली. मी मेहुणा प्रशांत याला तु येऊ नको मी सर्व पाहतो असे सांगीतले.

रस्त्याचे कामाकरीता शासकीय शुल्काची आवश्यकता नसल्याने मालगांव तलाठी कार्यालयात काम करणारे कांबळे मामा हे आमचे जमीनीमधुन रस्ता मागणी केले केसचा स्थळ पाहणी पंचनामा पुर्ण करुन आमचे बाजुने अहवाल पाठवण्याचे काम करुन देवून खटल्याचा निकाल जाबदार यांच्या बाजूने लागण्यास सहाय्य करण्यासाठी मागत असलेले १५,०००/- रुपये लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे.

आज रोजी मी तलाठी कार्यालय मालगांव येथे काम करणारे कांबळे मामा यांची तलाठी कार्यालय मालगांव येथे जावुन भेट घेणार आहे. कांबळे मामा हे माझ्याकडे १५,०००/- रुपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही.

माझेत व श्री कांबळे मामा यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती. आता मी आपले समक्ष तहसिल कार्यालय मिरज यांचेकडून रस्ता केस सुनावणीकामी हजर राहणे बाबत पाठवलेल्या नोटीसीची झेरॉक्स प्रत हजर करत आहे." अशी हकीकत नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन श्री.कांबळे, खाजगी इसम यांचेविरुध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच क्र.१ गणेश गदगडे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी १३.४९ वा चे सुमारास माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १३.५९ वा सुरु करुन तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार व पंच नं.१ गणेश गदगडे यांना श्री.कांबळे यांची तलाठी कार्यालय मालगाव येथे भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. तानाजी रुईकर हे त्यांचेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच १० डीएल ७७७१ मधून पंच नं.१ गदगडे यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच नं.१ गदगडे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी १४.०९ वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं १ श्री. गणेश गदगडे यांना, श्री.कांबळे, खाजगी इसम यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं १ यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून मालगाव गावातील तलाठी कार्यालय येथे गेलो. आम्ही कार्यालयाचे समोर कार पार्क करून चालत कार्यालयाजवळ गेलो. त्यावेळी कार्यालयाजवळ शेळया विक्रीचा बाजार भरलेला होता. त्यावेळी तक्रारदार हे कार्यालयाचे बाहेर एका इसमाशी त्यांचे कामा बाबत चर्चा करू लागले. त्यावेळी सदर इसमाने तक्रारदार यांना "ते संपवून टाकू की विषय..... क्लोज केस करून मिटवून टाकू........ यांचा रिपोर्ट घेवून केस हे जमा करून टाकू, आता काय निकालीच काढाय लागणार ना केस" असे म्हणाले. तक्रारदार व सदर इसमांचे बोलण्यावरून ते कांबळे, खाजगी इसम असल्याचे माझी खात्री झाली.

त्यावेळी तक्रारदार यांनी कांबळे यांना "काय करायच मग ते" असे विचारले असता कांबळे यांनी "आता ते तुमच्या हिशोबान काय करायच ते करा - मी काय बोलत न्हाय.... तुमच्या हिशोबान काय करायच ते करा, माझ मी ते निकाली काढून घेतो, विषय संपला, परत तिथ काय ते उद्भवणार पण नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "सांगा की काय असेल ते?" असे विचारले असता कांबळे यांनी "नाही काय सांगत नाय मी...... तुमच तुमी संपवून टाका आणि मोकळ व्हा.... माझ मी क्लिअर करून घेतो..... बाकीचा रस्ता मंजुर करताच येत नाय ना रस्ता........ रिपोर्ट देवून टाकून, ती केस जमा करून मोकळ होतो" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "हा..हा" असे म्हणाले. त्यानंतर कांबळे यांनी तक्रारदार यांना "तहसिल ऑफीसला देखील बोलून आलुय, सांगून पण आलोय, निकाली काढा म्हणून" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आपल्याकडन रिपोर्ट पाठवाय लागतुय का?" असे विचारले असता कांबळे यांनी "हयांच्याकडन सर्कलला वगैरे, आण्णासायबाला सांगून" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना "कधी पाठविणार रिपोर्ट काय?" असे विचारले असता कांबळे यांनी "उद्याच्या उद्या पाठवून जमा करून टाकणार केस" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना "कस काय करू या" असे विचारले असता कांबळे यांनी "द्या तुमी, काय तुमच्या इच्छेन ही करा, काय आडचण नाय........ तुमच तुमी द्या, माझ मी काम करून घेतो. असे म्हणाले.

त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा कांबळे यांना रक्कम सांगणेची विनंती केली असता कांबळे यांनी त्यांचे हाताचे "दहा बोटे" तक्रारदार यांना दाखविली. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना **"दहा पर्यंत?"** असे विचारले असता कांबळे यांनी **"करा, करा जावा"** असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी रक्कम कमी करणेची विनंती केली असता कांबळे यांनी त्यांना **"पंधरा सांगितले हुते, तुमाला आता बोलू शकत नाय मी" अस.... करा जावा, संपवून टाकतो विषय..."** असे म्हणून तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना चार...साडेचार पर्यंत येवू दे का अशी विचारणा केली असता कांबळे यांनी तक्रारदार यांना "चार साडेचार पर्यंत या" असे म्हणालेने तक्रारदार व मी असे तलाठी कार्यालय मालगाव येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.१ यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.१ गणेश गदगडे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व श्री.कांबळे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी ००२ ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, श्री.कांबळे, खाजगी इसम यांनी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचे शेतामधून जाणारे रस्ता मागणी अर्जाची चौकशी तलाठी व सर्कल यांना सागून अहवाल त्यांचे बाजुने देणेसाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच कांबळे यांनी तक्रारदार यांना दुपारी ०४.०० नंतर पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

श्री.कांबळे, खाजगी इसम यांचे लाच मागणी कृत्यामध्ये तलाठी अगर इतर कोणी लोकसेवक यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी १६.०० वा नंतर तक्रारदार व पंच नं.१ यांना पुन्हा श्री.कांबळे यांचेकडे पाठवून पडताळणी करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर आम्ही काही वेळ तानंग फाटा येथे थांबून राहिलो. त्यावेळी तक्रारदार यांनी ते जेवण करून १६.०० वा नंतर येत असल्याचे सांगून ते निघून गेले. त्यानंतर १६.३५ वा चे सुमारास तक्रारदार हे त्यांचेकडील कार मधून तानंग फाटा येथे आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच क्र.१ गणेश गदगडे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १६.४२ वाजता सुरु करुन तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचे गळ्यात लेसच्या सहाय्याने अडकविण्यास सांगितला त्याप्रमाणे त्यांनी तो गळयामध्ये अडकविला. त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच नं.१ श्री. गणेश गदगडे यांना श्री.कांबळे, खाजगी इसम यांची भेट घेण्यास तलाठी कार्यालय मालगाव या ठिकाणी जाणे करीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.रुईकर व पंच नं.१ श्री. गणेश गदगडे असे तक्रारदार यांचेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच-१०-डीएल-७७७१ मधून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. रुईकर व पंच नं.१ श्री. गदगडे असे आम्ही थांबलो त्या ठिकाणी परत आले. मी तक्रारदार यांना त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून देण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे गळ्यातील लेसच्या सहाय्याने अडकवलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून माझ्याकडे दिला. तो मी १७.२० वाजता बंद करुन सुरक्षिततेे करीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नंबर १ हे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसले. त्यानंतर मी, पंच नं १ श्री. गणेश गदगडे यांना, श्री.कांबळे, खाजगी इसम यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं १ यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून मालगाव गावातील तलाठी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार हे कार्यालयातील तलाठी यांचे कक्षामध्ये जावून कांबळे यांचेबाबत विचारणा केली. त्यावेळी तेथील तलाठी यांनी कांबळे यांना फोन करण्यास सांगितला असता तक्रारदार यांनी तलाठी यांचेकडून कांबळे यांचा मोबाईल नंबर घेवून त्यास फोन केला. परंतू कांबळे यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी यांना कांबळे यांना फोन करण्याची विनंती केली असता तलाठी यांनी कांबळे यांना फोन करून तक्रारदार यांचेशी बोलणे करून दिले. त्यावेळी कांबळे यांनी तक्रारदार यांना ते नोटीस बजावण्यास बाहेर गेले असलेचे सांगून ५ मिनीटामध्ये ऑफीसमध्ये येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी यांना त्यांचे नाव विचारले असता तलाठी यांनी त्यांचे नाव कोरे, तलाठी असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व तलाठी कोरे हे तक्रारदार यांचे कामा संदर्भात चर्चा करू लागले.

त्यावेळी तक्रारदार यांनी तलाठी कोरे यांना "मामा ना भेटून गेलो असल्याचे सांगून त्यांनी रिपोर्ट काय तर पाठवायचा हाय" असे म्हणालेचे सांगितले. त्यावर तलाठी कोरे यांनी "ते तहसिलदारन नोटिस काढलेली असत्या.... स्थळ पाहणी मॅडमची असत्या.... त्यामुळ आम्ही त्यात लक्ष घालत नाय" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार हे तलाठी यांचे कक्षामधून बाहेर कार्यालयाचे पोर्चमध्ये कांबळे यांची वाट बघत थांबले. काही वेळाने कांबळे हे कार्यालयात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी कांबळे यांची भेट घेवून त्यांचेशी कामाबाबत चर्चा करू लागले. त्यावेळी तक्रारदार यांनी कांबळे यांना "पंधरा तुमी सांगितलवता, पण दहा हजारमध्ये विषय संपतोय म्हंटल" असे म्हणाले. त्यावर कांबळे यांना "हा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "पुढ इथन रिपोर्ट पाठविल्यावर आणि काय हाय का काय?.... रावसायबांच, तलाठयांच आणि कुणाच काय आसल तर" असे विचारले असता कांबळे यांनी "नाय नाय नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "आता इथन कुणाकड जाणार ते?" असे विचारले असता कांबळे यांनी "आता तहसिलदारांच्याकड जाणार रिपोर्ट... सर्कलांच्या दोघांच्या सहीन जाणार ना आता ते" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना "कोरे तलाठी यांचे सहीने प्रकरण जाणार का असे विचारले असता कांबळे यांनी "हो त्यांच्याच सहीन जाणार" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी कांबळे यांना तलाठी कोरे यांची भेट घालून देणेची विनंती केली असता कांबळे यांनी तलाठीचे पुढे काही लोक बसले असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कांबळे यांना **"दहा हजारात आणि कमी काय हुतय का विचारा" असे म्हणाले असता कांबळे यांनी "नाय नाय काय नाय, हे काय किरकोळ सांगितलय तुमाला, एवढ काय मजे हे विषय नाय.." असे म्हणाले.**

त्यानंतर तलाठी यांचेपुढे बसलेले लोक निघून गेलेने तक्रारदार, कांबळे असे तलाठी यांचे कक्षामध्ये गेले, मी देखील त्यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी कांबळे यांनी तलाठी कोरे यांना "आण्णासायब, रस्त्याचा विषय, निकाली काढुन टाकायचा विषय हुता" असे म्हणाले. त्यावर तलाठी कोरे यांनी "ह" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तलाठी कोरे यांना "मामाशी झालय बोलण, काय मग ते संपवून घ्या विषय" असे म्हणाले. त्यावर तलाठी कोरे यांनी "तस काय मॅडमकड दिलाय ना" असे विचारले असता तक्रारदार यांनी "दिलय, आणि परत काय हे विषय संपून जावू दे" असे म्हणाले. त्यावर कोतवाल कांबळे यांनी "आण्णा काय होत नाय, तुमी काय टेन्शन घेवु नका.... एकदा झाल की त्याचा विषयच संपला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तलाठी कोरे यांना "काय आडचण येणार नाय ना परत" असे विचारले असता तलाठी कोरे यांनी "ते विषय कट केलाय ओ त्येनी सगळा, डोक्यातन काढुनच टाकलाय त्यांनी" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी कोरे यांना "येवू मग" असे विचारून आम्ही तलाठी यांचे कक्षामधून बाहेर आलो.

त्यावेळी कोतवाल कांबळे यांनी तक्रारदार यांना **द्या की इथ... द्या ओ इथ काय आडचण नाय" असे** म्हणून लागलीच पैशाची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना मिरजेतून जावून घेवून येत असे म्हणाले असता कोतवाल कांबळे यांनी "या जावा, या जावा" असे म्हणून पैसे घेवून येण्यास सांगितल्याने तक्रारदार व मी असे तेथून कारमध्ये बसून रवाना झालो.

त्यावेळी कारमधून जात असताना तक्रारदार यांना तलाठी कोरे यांचा दोन वेळेस फोन आला व तलाठी कोरे यांनी तक्रारदार यांना "कांबळे हे कोतवाल असून...त्याच्या नादाला न लागणेस व माझे अगर सर्कलचे नाव सांगून काही मागणी केल्यास त्यास काहीएक न देणेबाबत सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.१ यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.१ यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व श्री. कांबळे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी ००३ ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाई मध्ये, श्री.कांबळे यांनी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांचे शेतामधून जाणारे रस्ता मागणीचा अर्जाची चौकशी तलाठी व सर्कल यांना सांगून अहवाल तहसिल कार्यालय मिरज येथे पाठवून अर्ज निकाली काढण्यासाठी तलाठी व सर्कल यांचे नावाने स्वतःकरीता तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

कांबळे हे खाजगी इसम नसून ते कोतवाल म्हणून तलाठी कार्यालय मालगाव येथे नेमणुकीस असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी सापळा कारवाईकामी पोलीस निरीक्षक, श्री.योगेश चव्हाण यांना संपर्क करून आवश्यक त्या स्टाफसह तानंग फाटा मालगाव रोड येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

Gaulal

त्यानंतर काही वेळाने पोलीस निरीक्षक श्री.योगेश चव्हाण व पोकॉ/६८० चंद्रकांत जाधव हे शासकीय मो.सा. वरून आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी आम्ही पोलीस निरीक्षक चव्हाण यांना तक्रारदार व दोन्ही पंचांची ओळख करून देवून झाले कारवाईबाबतची माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री.तानाजी रुईकर यांनी, तलाठी कोरे यांचा त्यांना १७.५३ व १७.५६ वाजता २ वेळा फोन येवून गेल्याची हकीकत पंचांसमक्ष सांगितली. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री.रुईकर यांचे मोबाईलवरून तलाठी कोरे यांना फोन करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. पडताळणी कारवाई वेळी त्यांचेमधील संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. रुईकर यांना त्यांचे मोबाईल वरून श्री.कोरे, तलाठी यांचे मोबाईलवर फोन करून फोन स्पिकर मोडवर घेणेचे सुचना दिल्या. मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. ९३३७१११७७७ वरून तलाठी श्री.कोरे यांचे मो.क्र. ९८६०११५४६५ वर फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. तलाठी कोरे यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारलेनंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १७.५६ वाजता सुरू करून तक्रारदार यांचे समोर धरला. त्यावेळी तलाठी कोरे यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित प्रकरणामध्ये कोणासही पैसे न देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांचेतील बोलणे झालेवर फोन कट झालेनंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १७.५७ वाजता बंद केला.

श्री. कांबळे, कोतवाल यांनी तक्रारदार यांना पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याने लागलीच श्री.कांबळे कोतवाल यांचेविरूध्द तलाठी कार्यालय मालगाव येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे आम्ही सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना श्री.कांबळे कोतवाल यांनी लाच मागणी केलेप्रमाणे १०,०००/- रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचेकडील ५००/- रूपये दराच्या एकुण २० नोटा असे १०,०००/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहून घेतल्या. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, ॲंथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकात जाधव यांचेकरवी ॲंथ्रासीन पावडर लावुन १०,०००/- रूपयांचा नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी पथकातील पोशि/जाधव यांना तानंग फाटा येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यानंतर मी १८.०७ वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन घेतले.

त्यानंतर मी, तक्रारदार व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचे मोबाईलवर लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री.कांबळे कोतवाल यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर कार्यालयाचे बाहेर येवून हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १८.४५ वाजता सुरू करून लेसचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळयात अडकवला. त्यानंतर मी, तक्रारदार व पंच नं. १ गदगडे यांना श्री कांबळे कोतवाल यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच नं. १ श्री. गदगडे असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, पोलीस निरीक्षक, योगेश चव्हाण, पंच नं. २ श्री. चव्हाण, पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील, चालक रजपूत असे लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो एम एच १० डी क्यु ९५३० मधून रवाना झालो.

मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/६८० चंद्रकांत जाधव हे तानंग फाटा मालगाव रोड येथे सुटकेससहीत थांबून राहीले.

तक्रारदार श्री. रुईकर पंच नं. १ श्री. गदगडे हे कार मधून पुढे आणि मी व सापळा पथक असे शासकीय वाहन बोलेरोने त्यांचे पाठोपाठ रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांची कार मालगाव रोडने मालगाव गावातील तलाठी कार्यालय जवळ घेवून कार्यालयाचे बाजूस शेळयां विक्रीचा बाजार असल्याने त्यांची कार रोडलगत पार्क केली. मी दिले सुचनेवरुन चालक पोशि/विठठल रजपुत यांनी आमचेकडील शासकीय बोलेरो वाहन हे तक्रारदार व पंच थांबले ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवली. तक्रारदार व पंच नं.१ हे कार मधून उतरून तलाठी कार्यालयाजवळ चालत गेले. लागलीच मी व सर्व सापळा पथक कोणास काही संशय येणार नाही अशा रितीने

तलाठी कार्यालयाचे आजु-बाजूस सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यावेळी तलाठी कार्यालय मालगाव हे बंद असल्याचे दिसून आले. त्यानंतर तक्रारदार हे कोणास तरी फोन लावत असल्याचे दिसले.

त्यानंतर तक्रारदार रुईकर व पंच नं.१ गदगडे हे काही वेळ थांबून राहिलेचे दिसले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.१ कार्यालय बंद असल्याने तेथून रवाना होवून त्यांचेकडील कारमध्ये बसले. त्यानंतर मी तक्रारदार यांना इशारा करून त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो १९.०६ वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी तक्रादार यांना तानंग फाटा येथे जाणेचे सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं.१ गदगडे असे त्यांचेकडील कारमधून रवाना झाले. मी व सापळा पथक असे आमचेकडील शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ रवाना झालो.

त्यानंतर आम्ही तानंग फाटा येथे दाखल झालो. त्यानंतर मी पंच नं. १ श्री. गणेश गदगडे यांना सापळा कारवाईची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. १ यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील कार मधून तानंग फाटा येथून रवाना होवून मालगाव गावातील तलाठी कार्यालयजवळ दाखल झालो. तक्रारदार यांनी त्यांचेकडील कार रोडला पार्क करून तक्रारदार व मी असे तलाठी कार्यालयाजवळ गेलो. त्यावेळी तलाठी कार्यालयास कुलूप असल्याचे दिसले. त्यानंतर तक्रारदार रुईकर यांनी श्री.कांबळे, कोतवाल यांना फोन केला असता त्यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर आम्ही काही वेळ कार्यालयाचे बाहेर थांबून राहिलो. परंतू कोतवाल कांबळे यांचा कॉल आला नसल्याने व कार्यालय बंद असल्याने आम्ही तेथून रवाना होवून कारमध्ये बसलो" वगैरे हकीकत पंच नं.१ यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.तानाजी रुईकर यांना सापळा कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.१ यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगून आणखीन हकीकत सांगीतली की, तलाठी कार्यालय मालगाव हे बंद असल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. ९३३७१११७७७ वरून श्री.कांबळे, कोतवाल यांचे मो.क्र. ९९७०२५५७४९ वर २ वेळा कॉल केला असता त्यांनी कॉल स्विकारला नसल्याची हकीकत सांगितली.

झाले एकंदरीत सापळा कारवाईमध्ये, तलाठी कार्यालय मालगाव हे बंद असल्याने तक्रारदार व पंच नं.१ यांची श्री.कांबळे कोतवाल यांचेशी भेट झाली नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते आज रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे निश्चित केले. तसेच पडताळणी कारवाईमध्ये कोतवाल यांनी ते २ ते ३ दिवस बाहेर जाणार असलेने व तसेच कोतवाल कांबळे यांचा निरोप आलेनंतर त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार यांचेकडील ॲंथ्रासिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम पंचांसमक्ष सिलबंद करून आमचे ताबेत ठेवली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना लोकसेवक श्री. कांबळे, कोतवाल यांनी संपर्क केल्यानंतर आम्हास तात्काळ संपर्क करण्याच्या तसेच झाले कार्यवाही बाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देवून जाणेस सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले. त्यानंतर पुढील कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

त्यानंतर दि.१७/११/२०२५ रोजी तक्रारदार श्री.तानाजी रुईकर यांना श्री.कांबळे कोतवाल यांचा कोणताही निरोप न आल्याने आजरोजी पुन्हा सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार यांना ११.१२ वा चे सुमारास संपर्क करून त्यांना १२.३० वाजता तानंग फाटा मिरज येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. तसेच दोन्ही पंचांना संपर्क करून त्यांना तात्काळ इकडील कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच इकडील कार्यालयात ११.४५ वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/ऋषीकेश बडणीकर, पोकॉ/२००८ अजित पाटील व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, ॲंथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं.एमएच-१०-डीक्यु-९५३० मधून व पो.नि.योगेश चव्हाण व पोकॉ/चंद्रकांत जाधव त्यांचेकडील शासकीय मोटारसायकवरून कार्यालयातून ११.५५ वाजता रवाना होवून स्टेशन चौक, कोल्हापूर रोडने मिरज ते सोलापूर जाणारे हायवे मार्गे तानंग फाटा मालगाव रोड येथे सुरक्षित ठिकाणी १२.३० वा चे सुमारास दाखल झालो. काही वेळाने तक्रारदार हे त्यांचेकडील हुंडाई व्हेन्यु कार क्र. एमएच-१०-डीएल-७७७१ वरून आमचे समक्ष हजर झालेत.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. रुईकर यांना आमचेकडील शासकीय वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये बसले.

त्यानंतर आम्ही श्री.कांबळे कोतवाल यांचेविरूध्द तलाठी कार्यालय मालगाव येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी दि.१०.११.२०२५ रोजी सापळा कारवाईवेळी पंचांसमक्ष सिलबंद करून ठेवलेला लाच रक्कमेचा लखोटा बाहेर काढून लखोटा फोडून त्यामधील ५००/- रूपये दराच्या २० नोटा असे एकुण १०,०००/- रूपये पंचांसमक्ष हजर करून नोटांचे नंबर्सची खात्री केली.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, ॲंथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोह/बडणीकर यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन १०,०००/- रूपयांचा नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी पथकातील पोह/बडणीकर यांना तानंग फाटा येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर मी १२.४५ वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन घेतले.

त्यानंतर मी, तक्रारदार व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचे मोबाईलवर लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. कांबळे कोतवाल यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर कार्यालयाचे बाहेर येवून हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १३.०१ वाजता सुरू करून लेसचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळयात अडकवला. त्यानंतर मी, तक्रारदार व पंच नं. १ गदगडे यांना श्री कांबळे कोतवाल यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. तानाजी रुईकर व पंच नं. १ श्री. गदगडे असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. २ श्री. चव्हाण, पोशि/अजित पाटील, चालक रजपूत असे लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो एम एच १० डी क्यु ९५३० मधून व पोशि/जाधव व पो.नि.चव्हाण हे त्यांचेकडील शासकीय मो.सा. वरून रवाना झालो.

मी दिले सुचनेप्रमाणे पोह/बडणकर हे तानंग फाटा मालगाव रोड येथे सुटकेससहीत थांबून राहीले.

तक्रारदार श्री. रुईकर व पंच नं. १ श्री. गदगडे हे कार मधून पुढे आणि मी व सापळा पथक असे शासकीय वाहन बोलेरो व मो.सा.ने त्यांचे पाठोपाठ रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांची कार मालगाव रोडने मालगाव गावातील तलाठी कार्यालय जवळ घेवून कार्यालयाचे बाजूस असले जागेमध्ये पार्क केली.

मी दिले सुचनेवरुन चालक पोशि/विठठल रजपुत यांनी आमचेकडील शासकीय बोलेरो वाहन हे तक्रारदार व पंच थांबले ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवली. तक्रारदार व पंच नं.१ हे कार मधून उतरून तलाठी कार्यालयामध्ये गेलेचे दिसले. लागलीच मी व सर्व सापळा पथक कोणास काही संशय येणार नाही अशा रितीने तलाठी कार्यालयाचे आजु-बाजूस सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार रूईकर व पंच नं.१ गदगडे हे तलाठी कार्यालयाचे बाहेर येवून थांबलेचे दिसले. त्यानंतर काही वेळाने तलाठी कार्यालयातून एक इसम बाहेर येवून तक्रारदार यांचेजवळ येवून बोलत थांबलेचा दिसला.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांनी डावे खिश्यामधील हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला.

लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १३.१८ वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.

लागलीच सापळा पथक तलाठी कार्यालयाचे बाहेर पंच नं.१ गदगडे यांचेजवळ गेलो. त्यावेळी पंच नं.१ गदगडे यांनी सदरचे इसम हे कोतवाल कांबळे असून त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली असलेचे सांगितले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पो.नि.चव्हाण व पोशि/चंद्रकात जाधव यांनी लोकसेवक कांबळे कोतवाल यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडले. त्यानंतर लागलीच माझे सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील मोबाईल वरुन व्हीडीओ शुटींग सुरु केले.

त्यानंतर माझे सुचनेवरून पंच नं.२ चव्हाण यांनी लोकसेवक कांबळे, कोतवाल यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचा खिसा तपासला असता त्यामध्ये ५००/- रूपये दराच्या २० नोटा असे १०,०००/- रूपये मिळून आले.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पंच नं.२ श्री चव्हाण यांनी सदर लाच रक्कमेची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं २ श्री. चव्हाण यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक श्री.कांबळे, कोतवाल यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर मी लोकसेवक श्री कांबळे, कोतवाल यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. मामासो तिप्पाण्णा कांबळे, वय -५३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, महसुल सेवक (कोतवाल), तलाठी कार्यालय मालगाव रा. गणेश कॉलनी, गणेश मंदीराजवळ मालगाव, ता.मिरज जि. सांगली, वर्ग-४ मो.नं. ९९७०२५५७४९ असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या हया तलाठी कार्यालय मालगाव येथे पुर्ण केल्या आहेत. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सॅमसंग मोबाईलमध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. रुईकर यांचे रस्ता कामाचे प्रकरणातील आवश्यक कागदपत्राबाबत लोकसेवक श्री.कांबळे कोतवाल यांना विचारणा केली असता त्यांनी सदरचे प्रकरण तहसिल कार्यालय मिरज येथील साबळे, क्लार्क यांचेकडे असलेचे सांगितले. त्यानंतर आम्ही कोतवाल श्री. कांबळे यांना ताबेत घेवून तलाठी कार्यालय मिरज येथून रवाना होवून तहसिल कार्यालय मिरज येथे दाखल झालो. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकामा संबंधीत कागदपत्रे तहसिलदार यांच्या परवानगीने तहलिस कार्यालय मिरज येथील साबळे क्लार्क यांचेकडून ताबेत घेतली.

त्यानंतर आम्ही तहसिल कार्यालय मिरज येथून १४.४५ वा चे सुमारास रवाना होवून ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे १५.०५ वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. १ श्री. गणेश गदगडे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. १ यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील कार मधून तानंग फाटा येथून रवाना होवून मालगाव गावातील तलाठी कार्यालयजवळ दाखल झालो. तक्रारदार यांनी त्यांचेकडील कार रोडला पार्क करून तक्रारदार व मी असे तलाठी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार रुईकर यांनी कांबळे कोतवाल यांचेजवळ जावून त्यांचे प्रकरणामधील रिपोर्ट पाठविला का याबाबत विचारणा केली. त्यावर कांबळे कोतवाल यांनी "केस पाठवून दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी कार्यालयाचे बाहेर असले मोकळया जागेमध्ये थांबून राहिलो. काही वेळाने श्री.कांबळे कोतवाल हे कार्यालयाचे बाहेर येवून तक्रारदार यांचेशी त्यांचे कामा संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी कांबळे कोतवाल यांनी तक्रारदार यांना "आण्णासाहेबांना शंकला आल्या आहे...तुमची पर्सनॅलिटी ती बघून, निम्म घाबरलय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आता काय करायच देवान केलय आमाला तस तर" असे म्हणाले. त्यानंतर कांबळे कोतवाल यांनी तक्रारदार यांना "कुठ काय वाच्यता करणार नसाल तर देवून जावा" असे म्हणून लाचेची मागणी केल्याने तक्रारदार तानाजी रुईकर यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ॲथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून श्री.कांबळे कोतवाल यांचेसमोर धरून "दहा हजार आहेत ठरल्याप्रमाणे" असे म्हणाले असता कांबळे कोतवाल यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून "चालतय ठिक आहे" असे म्हणून लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली" त्यानंतर तक्रारदार यांनी हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला" वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. तानाजी रुईकर यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.१ गदगडे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. १०.११.२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. मामासो तिप्पाण्णा कांबळे, वय -५३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, महसुल सेवक (कोतवाल), यांनी तलाठी कार्यालय मालगाव येथे आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचे पत्नीचे (जाबदार) शेतामधून जाणारे रस्ता मागणीचा अर्जाची चौकशी तलाठी व सर्कल यांना सांगून अहवाल तहसिल कार्यालय मिरज येथे पाठवून केस निकाली काढण्यासाठी तलाठी व सर्कल यांचे नावाने स्वतःकरीता तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

तसेच दि. १७.११.२०२५ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक लोकसेवक श्री. मामासो तिप्पाण्णा कांबळे, वय -५३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, महसुल सेवक (कोतवाल), यांनी तलाठी कार्यालय मालगाव येथे आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचे पत्नीचे (जाबदार) शेतामधून जाणारे रस्ता मागणीचा अर्जाची चौकशी तलाठी व सर्कल यांना सांगून अहवाल तहसिल कार्यालय मिरज येथे पाठवून केस निकाली काढण्यासाठी तलाठी व सर्कल यांचे नावाने स्वतःकरीता तक्रारदार यांचेकडून १०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी श्री.मामासो तिप्पाण्णा कांबळे, वय -५३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, महसुल सेवक (कोतवाल), वर्ग-४, तलाठी कार्यालय मालगाव रा. गणेश कॉलनी, गणेश मंदीराजवळ मालगाव, ता.मिरज जि. सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ (अ) प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(स.पो.नि. पवार)

पोलीस स्टेशन अधिकारी
मिरज ग्रामिण पोलीस ठाणे

हा दिला वर्दीजबाब,